नियमित फौजदारी खटला क्र.२५८/२०१९
निशाणी क्रमांकः– ५०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक्र ०१ यांची साक्ष शपथेवर सुरु –**

माझे नावः संजिवनी रविंद्र गाडे,
वयः ३८ वर्ष, धंदाः शेती,
राहणारः रा. मायगाव देवी, ता. कोपरगाव जि. अहमदनगर.

---

**सरतपास अभियोग पक्षातर्फे मा.सहा.सरकारी वकीलः–**
**श्रीमती ए. ए. शेख यांच्या मार्फत–**

१. मी माझ्या पती व कुटुंबियांसोबत मायगाव देवी येथे एकत्र् राहावयास आहे. आरोपी आमचे भाउबंद आहेत. माझे पती रविंद्र गाडे यांनी सन २००६ मध्ये भगीरथ गाडे यांच्याकडून मायगाव देवी येथे घरासाठी जागा खरेदी घेतली होती. त्यावरती आम्ही घर बांधून राहावयास आहोत. आरोपी बाळू यांना आम्ही जागा घेतल्याचा राग होता. ते आम्हाला तुम्ही राहता ते घर आमचे आहे तेथे तुम्ही राहू नका असे म्हणायचे. त्या कारणावरुन ते आम्हाला शिवीगाळ करुन दमदाटी करायचे.

२. दिनांक २३–०२–२०१८ रोजी सकाळी ८.३० च्या दरम्यान मी माझ्या किचनमध्ये काम करत होते. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ७ हे त्यांच्या हातामध्ये घरसामान रॅक्, पलंग, कोठ्या इ. घेउन माझ्या घरासमोर आले त्यावेळी आरोपी बाळू हा आम्हाला म्हणाला की, हे घर आमचे आहे, खाली करा, आम्ही त्याचा ताबा घेणार आहोत. त्यावेळी मी व माझे पती दोघे ही जागा आमची आहे असे समजावून सांगितले असता आरोपी क्र. १ बाळुने आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली व त्यांच्या हातातील सामान आमच्या घरात टाकले. त्यावेळी माझी

जाउ मंदा हिला इतर आरोपींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी मी आरोपींना समजावण्यास गेले असता आरोपींनी मला देखील लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्या झटापटीमध्ये माझी व माझ्या जाऊची पोत तुटून गहाळ झाली.

३. त्यानंतर मी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे जाउन तक्रार दिली. आता मला दिनांक २३-०२-२०१८ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येते.

**<u>सरतपास पूर्ण</u>**.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विव्दान वकील श्री. पी. यु. गाडे यांच्या मार्फतः</u>-**

४. भगीरथ गाडे यांना किती भाउ आहेत हे मला माहीत नाही. माझ्या पतीने सदरची जागा खरेदी केली तेव्हा ती जागा आरोपी क्र. १ बाळु गाडे याच्या ताब्यात होती किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमच्या विरुध्द केस केली होती. हे मला माहीत नाही की, त्या प्रकरणामध्ये आमची तडजोड झाली होती व माझ्या पतीने आरोपींना ७५ हजार रुपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणामध्ये एकमेकांविरुध्द केलेल्या केसेस परत घेण्याचे ठरले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ याला घटनेवेळी अर्धांगवायू झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला कधीही जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शेतीच्या वादातून आरोपी विरुध्द खोटी

केस केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी माझी जाउ माझ्या सोबत किचन मध्ये नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

YOUNUS JAFAR TAMBOLI
Digitally signed by YOUNUS JAFAR TAMBOLI
Date: 2025.07.09 10:27:44 +0530

दिनांकः ०८/०७/२०२५.
कोपरगाव.

( वाय.जे. तांबोळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोपरगाव